॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

## जनसंपर्क विभाग

बातमी - १

जळगाव ७ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे बी.बी.ए, बी.एम.एस., बी.एम.एस. (ई-कॉमर्स), बी.सी.ए., एम.एम.एस. (कॉम्प्युटर मॅनेजमेंट), एम.एम.एस. (पर्सोनेल मॅनेजमेंट), एम.सी.ए. (Integrated) व एम.बी.ए. (Integrated) या वर्गाच्या पदवी व पदुव्यत्तर अभ्यासक्रमांसाठी केंद्रिय प्रवेश परीक्षा दि.२५ जुलै रोजी घेतली जाणार आहे.

यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर www.nmu.ac.in) दि. १ जून पासुन ऑनलाईन प्रवेश अर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सदर प्रवेश अर्ज संकेतस्थळावर भरण्याची अंतीम तारीख १६ जुलै, २०१९ आहे. विद्यापीठाने घोषित केलेल्या संबधित स्विकृती केंद्रावर (ARC) प्रवेश अर्ज दि. १७ जुलै, २०१९ पर्यंत स्विकारले जातील. प्रवेश अर्जासोबत प्रवेश अर्जाची प्रिंट व त्यासोबत योग्यती कागदपत्रे आणि रूपये ३००/- चा धनाकर्ष (D.D.) स्विकृत करण्यात येईल. प्रवेश पात्र विद्यार्थ्यांची यादी दि. १९ जुलै, २०१९ रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर www.nmu.ac.in प्रसिध्द करण्यात येईल. सदर यादीबाबत विद्यार्थ्यांना काही आक्षेप नोंदवायचा असेल तर दि. २० जुलै, २०१९ पर्यंत लेखी स्वरूपात प्रवेश अर्ज स्विकृती केंद्रावर (ARC) स्विकृत करण्यात येतील.

दि. २२ जुलै रोजी पात्र विद्यार्थ्यांची अंतिम यादी जाहिर करण्यात येईल दि. २३ जुलै रोजी विद्यापीठ संकेतस्थळावर परीक्षेसाठी परीक्षा प्रवेश पत्र उपलब्ध होतील. प्रवेश पत्रावर विद्यार्थ्याचा फोटो व त्यावर प्राचार्यांचा सही शिक्का घेण्यात यावा. सदरची परीक्षा दि. २५ जुलै रोजी घेण्यात येईल असे प्रवेश प्रक्रिया समिती अध्यक्ष प्राचार्य डॉ. पी.पी. छाजेड यांनी कळविले आहे.

----------

बातमी - २

जळगाव ७ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील अध्ययन व संशोधन केंद्र आणि आशा फाऊंडेशन यांच्यातर्फे `मला काही शिकायचंय` या विषयावरील निवासी शिबीराच्या तिसऱ्या दिवशी `मी दहा वर्षानंतर` या विषयावर विद्यार्थ्यांच्या भविष्यातील वाटचाल, स्वत:चे व्यक्तिमत्व, स्थान आणि आपल्या बौध्दिक क्षमतेनुसार आपला रोजगार, नोकरी काय असणार आहे यावर भाष्य करीत सहभागी विद्यार्थ्यांनी आपली मते मांडली.

आज दिवसभर या शिबीरात विद्यार्थ्यांना विविध विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. समूह उपक्रमांतर्गत आजच्या युवकांची आचासंहिता या विषयावर प्रा.अमरदीप पाटील, स्कुल ऑफ केमिकल सायन्सेस यांचे व्याख्यान झाले. यात त्यांनी भविष्यात आपल्याला काय करायचे आहे त्याविषयी आतापासून आपण विचार करायला पाहिजे तसेच काही कार्य करावयाचे असल्यास ध्येय निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच शिक्षणासोबत काय करावे व काय करू नये याची नियमावली तयार करून घ्यावी. कोणत्याही प्रकारचे व्यसन लावून घेवू नका असा सल्ला यावेळी त्यांनी दिला.

इमॅजिन इंडिया या विषयावरील समूह चर्चेत वैज्ञानिक क्षेत्रात भारत भविष्यात कुठल्या स्थानावर असेल, राजकारण कसे असेल, टेक्नॉलॉजी कशा पध्दतीने विकसीत होईल आदी विषयावर चर्चेत विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. भारत २०३० या विषयावरील परिसंवादात डॉ.विवेक काटदरे यांनी भारतातील विज्ञान व तंत्रज्ञान तसेच आर्थिक व्यवस्थेवर प्रकाश टाकला. मी वाचलेले पुस्तक या विषयावर विद्यार्थ्यांनी कुठले पुस्तक भावले, त्यातील विषय आदींबाबत सादरीकरण केले.

या शिबीरात विद्यार्थ्यांनी विटी दांडू, गोट्या आदी पारंपारिक मैदानी खेळ खेळून मौजमस्ती केली. प्रा.मनीष जोशी, गिरीश कुळकर्णी, वसुधा सराफ आदी मार्गदर्शन करीत आहेत.

------------------------------------------------------------------------------------------

जा.क्र. : कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : ७ जून, २०१९

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत //--

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

☎ : (९१) ०२५७- (२२५७२४८, २४९, २५३) वेबसाईट : www.nmu.ac.in

फॅक्स : (९१) ०२५७- (२२५८४०३, ४०६) ई-मेल : pro@nmu.ac.in